# प्रभुतरुण

वर्ष ४८ | अंक ८ | मुंबई | फेब्रुवारी २०१५ | पाने ६ | किंमत रु. १

*(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३)*

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

www.prabhutarun.org

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*संपादकीय*

## सृजनाचा सोहळा

**—सुहासिनी कीर्तिकर**

मातीत बियाणं पेरलं की 'वऱ्हे पसरली माती'. मग त्या मातीतून एक लसलसता डीर (कोंब) हलकेच उगवतो. चैतन्याचा मूर्तिमंत गाभाच तो. जीव त्याचा इवलुसा. वारा, ऊन, पाणी यांनी मग याच कोंबामध्ये जादुई बदल होतो. हळुचकन् त्या कोमल, कोवळ्या काठीशी दोन हिरवे दोस्त पालवतात. काही दिसांनी या दोस्तांनी आपले गाणे गायला सुरुवात केलेली असते. वाऱ्यावर झुलत-डुलत. आकाशाशी गूज करत. हिरवा कवळा रंग अधिकच खुलवत. 'टाया वाजविती पानं, दंग देवाच्या भजनी' असं रूपडं शेतकरी मनाच्या कवयित्री बहिणाबाईंना दिसतं, भासतं. अन् त्यांच्याच मनात आलेले विचार घेऊन आपलं मन म्हणतं, 'होऊ दे रे आबादानी!' जिथे जिथे चैतन्य आहे, तिथे तिथे हा चैतन्याचा उरूस असतोच. मग तो हिरव्या मनाला अधिक गारवा देणाऱ्या बरव्या ऋतूत असतो, शाळेच्या आवारात किलबिल करणाऱ्या शाळकरी लाटातरंगात असतो, 'सगळ्या आठवणी जुळून' आणणाऱ्या दूरवरच्या 'आसावरी' स्वरात असतो, स्वयंपाकघरातील गोडाधोडाच्या - खमंग तिखटमिठाच्या नवनिर्मितीत असतो, परस्पर 'ओढ लागे जीवा' वाटणाऱ्या, रोखून पहाणाऱ्या 'जुल्मी डोळ्यात' असतो, या डोळ्यांवाटे झरणाऱ्या प्रेमाला साद मिळाल्यावर दो देहमनाच्या मीलनसमाधीत असतो अन् या समाधीतूनच पुन्हा पुन्हा समृद्ध होणाऱ्या जीवाच्या चैतन्यमयी नवजन्मातही असतो. जिथे सृजनाची किमया आहे; तिथे तिथे चैतन्याचा आनंद आहे, साक्षात्कार आहे. पण....

नवजन्म हा काही फार सहज नाही. 'अज्ञाताच्या कुंपणावरून' पलीकडे उडी मारून या चैतन्याची बिजली हाती लागते. एखाद्या प्रतिभावंताच्या प्रतिभेसारखी. 'आधी हाताला चटके, मग मिळते भाकर' हे सगळीकडेच खरे आहे. माणसाच्या विश्वात नव्यानं जन्म घेऊन नवीनच जग पहाणाऱ्या बाळाला ही वेदना सहन करावी लागते. धडपड करावी लागते. नाळेशी बांधलेले बंध तसेच ठेऊन स्वत:चे नवे अस्तित्व आकाराला आणण्यासाठी चित्‌शक्तीच्या जोरावर उसळी घ्यावी लागते. एकाच नाळेने जोडलेल्या जीवाची ही जगात येण्यासाठी चालणारी धडपड फक्त त्या बाळाची एकट्याची नसतेच, नसते. ती ते बाळ दिसामासांनी मोठे करणाऱ्या आईच्या कुशीचीही असते. म्हणूनच त्या बाळाच्या जन्म घेण्याच्या धडपडीतल्या वेदना आईच्याही सहवेदना असतात. किंबहुना या वेदनांनीच तिचे मातृत्व साकारत असते. एक बाई 'आई' बनत असते. बाळ 'आई' पणाला जन्म देत असतं. 'चाईल्ड गिव्हज् बर्थ टू अ मदर!' द्वैत अद्वैताची ग्वाही देणारी ही दोन जीवांची नवजन्मकथा किती सुंदर. वेदनांच्या वाटेवरची - सृजनाचा सोहळा अन् आनंद देणारी. म्हणूनच मग स्त्री ही 'क्षणभराची प्रेयसी अन् जन्मभराची माता'. मग काय विचारता?

ते इवलेसे पापण्या, भुवया अजून न ठसलेले पापणबंद डोळे, ते इवलेइवलेसे नाक, त्याखाली दूध भरलेले इवलेसे पाखरू असावे असे दोन ओठ. त्या ओठांना आपल्या मखरात बसवणारे कोवळे, गुलाबीगुब्ब गाल. कान तर एखाद्या सुंदर चैतन्यमयी ठिपक्यासारखे. इवलुसं धपापणारं अंग अन् त्या अंगाचं बळ घेऊन 'टाया वजविती पानं' असणारे छाऽऽनसे दोन हात. दहा बोटांनी जणू ते हात जगण्याचं काव्यच हवेत लिहीत असतात. सारखं सतत-हलत-जीवंत थरथरत. कधी थकून आपल्याच डोक्यामागे विसावत हे हात त्या जीवंत

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## आई...

**-त्वरिता संजय दळवी**

आई...

म्हणजे वात्सल्य, आई म्हणजे प्रेम, आई म्हणजे विश्व.... आई सारखे दैवत साऱ्या जगतावर नाही... असं आपण लहानपणापासून ऐकलं, अनुभवलंय.

आई म्हटले की सहसा ह्याच भावना आपल्या मनात येतात. ती जन्मदात्री असते. तीच आपल्या मुलांच्या मन:पटलावर आयुष्याचा श्रीगणेशा मिरवते. आपल्याला जगायला शिकवते. तिचा प्रत्येक श्वास आपल्या मुलांच्या पालन-पोषणात आणि त्यांच्या उज्ज्वल भवितव्याच्या वाटचालीसाठी वेचलेला असतो. असं म्हणतात की मातृऋण कधीच फेडता येत नाही. माझेही हेच मत आहे. सामान्यत: सर्वांचे आईबद्दल असेच मत असते.

पण कोमलचा अनुभव वेगळा होता....

कोमल ...... एक अनोळखी सहप्रवासी. एका रात्री, खूप उशीरा केलेल्या गाडीच्या प्रवासात तिची माझी ओळख झाली. ओळख कसली, फक्त दहा मिनिटांचा एकत्रित केलेला प्रवास आणि त्या दरम्यान आम्ही जे काही बोललो तेवढाच काय तो आमचा परिचय. तिने जे काही सांगितले त्याने माझ्या मनात विचारांचे काहूर माजले.

त्या रात्री खूप उशीर झाला होता. गाडीच्या डब्यात मी एकटीच होते. मी खाली उतरणार इतक्यात गाडी सुरू झाली. एक तरूणी दोन्ही खांद्यावर भल्या मोठ्या ट्रॅव्हल बॅग्ज घेऊन धावतच चालत्या गाडीत चढली. डब्यात कुणीच नाही हे पाहून माझ्या समोरच्या सीटवर येवून बसली आणि आजूबाजूला पाहू लागली. मी तिला सांगितलं की मी मालाडला उतरणार आहे. तुला हवं असेल तर तूही उतर आणि पुरुषांच्या डब्यात जा. तर ती म्हणाली, 'मुझे कांदिवली जाना है.'' मी मनात म्हटलं, ठीक आहे. कांदिवलीला काही बायका चढतील डब्यात, मग मलाही सोबत होईल. सहज समोर पाहिले तर ती तरुणी हुंदके देत रडत होती. न राहवून मी तिला विचारले, 'क्या हुआ बेटी?' तिने जे काही सांगितले ते ऐकून माझ्या मनात कित्येक प्रश्न उभे राहिले. २८ वर्षांची कोमल, तिच्या आई आणि धाकट्या भावासहीत एका चाळीत रहात होती. ती नोकरी करून घर सांभाळत होती. काही महिन्यांपूर्वी तिने आपला जोडीदार निवडला आणि घरच्यांच्या संमतीने आपल्या लग्नाची तारीखही ठरवली. लग्नाला अजून थोडा अवकाश होता, कारण हिला आपल्या लग्नाची तयारी करायची होती. तयारी म्हणजे कपडेलत्ते, दागिने वगैरे. स्वत:साठी एक सोन्याची आंगठी आणि नवऱ्यासाठी एक चेन. बाकी सारे दागिने ती एक ग्रामचे घेणार होती. सगळा खर्च तीच करणार होती कारण ती मोठी होती. कमावती होती. तिच्या भावाचे शिक्षण तिच्याच पैशातून झाले. तोही आता नोकरी करत होता. चाळीतील खोली तिनेच लोन घेवून विकत घेतली आणि आईच्या नावावर केली होती. सर्व कर्तव्य पार पाडून तिला स्वत:च्या घरी जायचे होते. स्वत:चा संसार थाटायचा होता. पण तिने चेन आणि आंगठी घेतली म्हणून तिच्या आईचा संताप अनावर झाला आणि तिने हिला बेदम मारले. हातावरचे, मानेवरचे व्रण तिने मला दाखवले. आईचे म्हणणे होते की काय गरज होती एवढा खर्च करायची! त्या पैशात तिच्या भावासाठी एक स्कूटर घेता आली असती. कोमलच्या मते तोही कमावता होता. तेव्हा त्याच्या गरजा आता त्याने स्वकमाईवर भागवाव्यात. पण खर्च करायची वेळ आली की तो सरळ हात वर करायचा. त्याला खोली स्वत:च्या नावावर करून हवी होती. याला विरोध करायचे सोडून आई उलट हिलाच लग्न लांबणीवर टाकायला

(पान २ कॉलम ३ वर)

(पान १ कॉलम २ वरून)

कवितेला पूर्णविराम देतात. अन् पाय? ते तर हातांचेच सवंगडी. गुंडाळ्यात बांधलेले म्हणून आपलं ‘सुखाचं गाठोडं’ होऊन जऽऽरा विसावतात. नाहीतर त्या पायांना हलत्या खेळण्यासारखी एक चावीच विधात्याने जणू दिलेली असते. हातपायाचा झोका, एका लयीत श्वासाचं संगीत गाणारं शरीराचं वाद्य, असं हे सुखाचं रुपडं. गुंडाळ्यात गुंडाळलेलं. मुखाभोवती फ्रीलवालं टोपरं असलेलं. हे टोपरं जणू त्या चेहऱ्याला हसरं-सुंदर फूलच बनवतं. त्या टोपऱ्याच्या आत तेलाचा कापूस ठेवलेलं एरंडाचं पान असलं की फुलाला छान हिरव्या पानांचा देठ वा फूलपंख असल्यासारखं वाटतं. किती किती गोऽऽड! बाळ झोपेतच हसलं, बाळाने एक ओठ मुडपून हालचाल केली, अरे! डोळे उघडले, डोळे मिटून ते गुरगुटून झोपलं, बाळ रडलं, ...... इतकंच काय; बाळांनं ‘सू सू’ केली, बाळानं ‘पॉटी’ केली, बाळ दूध पिऊ लागलं.... सगळंच एक जीवंत काव्य... चैतन्यमय सृजन सोहळा. बाळ गाढ झोपलेलं असलं तरी एका श्वासाच्या लयीत थोडी हालचाल होते, कसला तरी अस्पष्ट पण जाणवणारा ताल ते बदलते, झोपेतली ती लोभस आकृती जाणवेल न जाणवेल अशी वेगळी सौंदर्याकृती जराही न हलता ते तयार करते. रमेश तेंडुलकरांनी कवितेबद्दल बोलताना एकदा हे उदाहरण दिल्याचं स्मरतं. कविता सतत एका लयीत अर्थपूर्ण होत वहात असते. पण कळेल न कळेल असा क्षण पकडत ती लय एखाद्या अक्षरानं बदलते अन् अधिक सुंदर होते - जशी पु. शि. रेग्यांची कविता! हे सांगताना स्थिर असणाऱ्या झोपलेल्या बाळाचं असं कळत नकळत किंचित् हालचाल करणं त्यांना आठवलं होतं. खरंच. सतत अनुभवाला येणारा हा सुंदर बंध, सृजनाचा सोहळाच ना!

तेवढंच नाही. नेत्रसुखाबरोबर स्पर्शसुख किती त्यात. बाळाच्या कोवळ्या स्पर्शाला तुलनाच नाही. त्याला कोवळ्या दुधाचा गंधही असतो बरं! हल्ली पावडरी, उटणी, काजळ, धूपावणं बाद झालं असलं तरी बाळ म्हटलं की रस, गंध, स्पर्श, नाद, रूप अशा पंचेंद्रिय संवेदनांनी आपला दिवस ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ उमटवीत असतो.

असे ‘आनंदाचे तरंग’ सध्या माझ्यापर्यंत लाटालाटांनी येत आहेत. मी त्यात चिंब आहे सध्या. इंदिरा संत म्हणतात त्याप्रमाणे - ‘सुख आले लाटालाटांनी’ त्या लाटेतला एखादा तुषार या लेखाद्वारे वाचकहो; तुमच्यापर्यंत येतोय. तेव्हा सृजनसोहळा साजरा करीत आनंदी आनंद भोगा तुम्हीही! नाहीतरी याच महिन्यात ‘व्हॅलेंटाईन्स डे’ ही आहेच. परस्पर प्रेमसोहळा साजरा होऊ द्यात. ‘मुटु मुटु मोदू’ (म्हणजे कानडीत ‘खूप खूप आनंद’!) तुम्हा सर्वांना!

## पत्र प्रतिक्रिया

माननीय सुहासिनी कीर्तिकर
संपादिका, ‘प्रभु तरुण’ मुंबई

**विषय : पाठारे प्रभु ज्ञातीला अभिमानास्पद अशी घटना**

स. न. वि. वि.
महोदया,

आपल्या मा. प्रभु ज्ञातीला भूषणावह अशा दोन घटना अलिकडेच संपन्न झाल्या. तत्संबंधी माहिती वाचकांच्या माहितीसाठी आपण आपल्या सुप्रसिद्ध वर्तमानपत्रात प्रकाशित करावी, ही विनंती.

१) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे वंशज पुतणे, हिंदुत्वाचे प्रखर प्रचारक, महाराष्ट्र मिलीटरी स्कूल ठाणेचे संस्थापकअध्यक्ष विक्रमराव सावरकर यांनी श्री. प्रताप वेलकर यांना (मला) ‘प्रज्वलंत’ नियतकालिकात प्रकाशित केलेले त्यांचे सर्व साहित्य, लेखनाद्वारे वा पुस्तकाद्वारे पुनर्प्रकाशित करण्याचे अधिकार संपूर्णतया दिले आहेत.

२) महाराष्ट्राची पहिली सहकारी बँक डेक्कन मर्चन्टस कॉर्पोरेटीव्ह बँक. लि. सन १९१७ साली लोकमान्य टिळकांच्या स्वदेशी चळवळीच्या वेळी स्थापन झालेल्या बँकेचे अध्यक्ष डॉ. मो. बा. वेलकर होते. सतत १५ वर्षे बँकेची सेवा केल्याबद्दल बँकेच्या शेअर होल्डर्सनी रौप्य ज्युबिलीचे वेळी, डॉ. वेलकरांचे एक भव्य तैलचित्र बँकेच्या सभागृहात लावण्यास १९४२ साली दिले होते. ते मुख्य शाखेच्या भिंतीवर बरेच वर्षे विलसित होते.

ते तैलचित्र आता मुंबई विद्यापीठाच्या राजाबाई टॉवर ग्रंथालयात, तेथे असलेल्या डॉ. वेलकर्स कलेक्शन्सच्या लोखंडी कपाटाजवळ ठेवण्यात आले आहे. अर्थात् मुंबई विद्यापीठाच्या वरिष्ठ पदाधिकारांच्या अनुमतीनुसारे मुख्य ग्रंथपाल डॉ. अहिर, सिनियर असिस्टंट डॉ. सौ.अंजली काळे, डॉ. सायम छाया यांनी ते रीतसर ताब्यात घेऊन ठेवून घेतले. या प्रसंगी डॉ. शुभदा पंड्या - ब्रेन सर्जन डॉ. सुनील यांच्या पत्नी, डॉ. अंजली काळे, संबंधित स्टाफ, सर्वश्री प्रताप वेलकर, परिमल तळपदे, तेज वेलकर, रिषीकेश वेलकर, अरविंद धुरंधर जातीने हजर होते. तैलचित्राची व सोबत हजर असलेल्या व्यक्तींची छायाचित्रे घेण्यात आली. सध्या ग्रंथालयाचे नूतनीकरण चालू आहे. स्वागतसमारंभ नूतनीकरण पूर्ण झाल्यावर करण्यात येणार आहे.

तरी वरील माहिती आपल्या सुप्रसिद्ध वृत्तपत्रांत येत्या अंकी यावी ही विनंती. धन्यवाद.

आपला,
**प्रताप मो. बा. वेलकर**

विस्तारीत संपादकीय
(पान १ कॉलम ४ वरून)

सांगत होती. शेवटी धाडस करून आपल्या होणाऱ्या नवऱ्याला आणि त्याच्या घरच्यांना फोन करून इथल्या परिस्थितीची कल्पना करून दिली आणि सामान उचलून त्यांच्या घरी जायला निघाली.

कोमल मला विचारत होती, ‘‘माझं काय चुकलं? माझीच आई असं का वागली?’’

कोमल कांदिवलीला उतरून गेली पण माझ्या मनात वादळ उठवून गेली.

का वागली असेल तिची आई अशाप्रकारे :

१. **स्वार्थ?**....... प्रत्येक माणूस प्रथम आपला व आपल्या भविष्याचा विचार करतो. सहसा आईवडील प्रथम आपल्या मुलांचा विचार करतात. स्वतःच्या भविष्यापेक्षा आपल्या अपत्यांच्या भविष्याला प्राधान्य देतात. पण काही माणसे मुळात स्वार्थी असतात. स्वतःच्या आवडी निवडी, स्वतःच्या गरजा त्यांना महत्त्वाच्या वाटतात. मग ते कुणाचाही विचार करत नाहीत. नाती त्यांच्यासाठी आपल्या गरजा भागवण्याचे साधन वाटतात. आपल्या स्वार्थासाठी ते कुणाचाही वापर करू शकतात आणि त्याबद्दल त्यांना मनाचीही लाज वाटत नाही.

- कोमलच्या आईनेही स्वतःचा स्वार्थ साधण्याचा विचार केला असेल. मुलगी लग्न करून गेल्यावर आपले घर कसे चालेल हा विचार तिला अस्वस्थ करत असेल. यापेक्षा ती अविवाहीत राहणं आईच्या दृष्टीने सोईस्कर असेल. जीव जाण्याची वेळ आल्यावर गोष्टीतल्या माकडीणीने आपल्या पिल्लाला पायाखाली धरले होतेच ना? पण मग मुक्या प्राण्यात आणि माणसात काहीच फरक नसावा?

२. **विचारसरणी?**...... समाजात आजही मुलाला मुलीपेक्षा वेगळी वागणूक दिली जाते. कित्येक मातांसाठी मुलगा महत्त्वाचा असतो भलेही तो बिनकामाचा असो. मुलांपेक्षा मुलींनी मातापित्याची सेवा अधिक प्रमाणात केली. गरजेच्यावेळी त्यांच्या उपयोगी पडल्या. तरीही मुलाची बाजू श्रेष्ठ ठरते. मुलीने त्यांच्यासाठी केलेल्या कष्टांची जरी त्यांना जाण असली तरी मुलगा किंवा मुलगी असा प्रश्न पुढ्यात उभा राहिला, की मुलाला झुकते माप दिले जाते.

- कोमलच्या आईनेही विचार केला असेल की तिला उर्वरित आयुष्य मुलासोबत घालवायचे होते. तोच वंशाचा दिवा होता. तोच तिच्या चितेला अग्नी देणार होता. मुलगी लग्न करून निघून गेल्यावर तिला मुलावरच अवलंबून रहावे लागणार होते. त्याला दुखावणे तिला परवडणारे नव्हते.

३. **परिस्थिती?** ........ जावे त्याच्या वंशा... या न्यायाने प्रत्येक माणसाची परिस्थिती वेगळी असते. प्रत्येक जण आपले आयुष्य आपल्या पद्धतीने जगत असतो. घराघरातील वातावरण वेगळे असते. प्रत्येक घरातील प्रत्येक माणसाचा स्वभाव वेगळा असतो आणि त्या माणसाची दुसऱ्या माणसाशी वागण्याची पद्धत वेगळी असते. त्यामुळे नातेसंबंध कोणी कसे सांभाळावेत हे प्रत्येक जण परिस्थीतीनुसार ठरवत असतो. म्हणूनच कोणी कसे वागावे हे ज्याचे त्याला ठरवावे लागते. दुसरे कुणीही त्याला सांगू शकत नाही.

- परावलंबी आयुष्य जगताना कोमलच्या आईने परिस्थितीला साजेसे वर्तन केले. त्या घरात, त्या वातावरणात तिला योग्य वाटले तशीच ती वागली.

कोण योग्य, कोण अयोग्य, आपण ठरवू शकतो का?

**शेवटी भावनांपेक्षा व्यवहार श्रेष्ठ ठरतो.**

आपल्याला काय वाटतं? लेखाच्या निमित्ताने आपण संवाद साधूया का?

आपली मते आणि अभिप्राय जरूर कळवा.

*

## आवाहन

✶ ‘विस्तारीत संपादकीय’ म्हणून त्वरिताचा पहिलाच लेख. योगायोग असा की, माझाही लेख ‘आई’पणावर आहे. विभावरी शिरूरकरांनी पन्नासच्या दशकात ‘बाबांचा संसार माझा कसा होणार?’ ही कथा लिहिली . अलीकडे मेघना पेठेंच्या कथेत विवाहीत मुलीचे लैंगिक सुखसमाधान पाहून तिच्या विधवा आईला असूया वाटलेली दाखविली आहे. आई ही आदर्श संकल्पना. पण घर चालविण्यासाठी आईच मुलीचा देहविक्रय करते; असेही चित्रण वास्तव म्हणून येते. मुलीचा प्रियकर तोच आईचा यार असेही घडते. ‘छापा काटा’ नाटकही आजचेच आहे. अशावेळी ‘आई’ या कोमल विषयावर कोमलचा अनुभव त्वरिताने दिलाय. केवळ आपल्याशी संवाद साधावा म्हणून. तेव्हा वाचकहो, संवाद जरूर जरूर साधा. असा संवाद साधलात तरच व्यवस्थापकीय बदलांची आम्हाला पावती मिळेल.

**-संपादक**

*

लेखांक-२

# अर्थसंवाद

-सौ. उर्वशी आनंद धराधर

चला बँकेत खाते उघडले. आता पुढे काय? बँकेच्या व्यवहाराची थोडी माहिती घेऊ या. आपल्या बँकेतील जमा व खर्चाची नोंद आपणास पासबुकाद्वारे मिळत असते. आपली बँकेतील शिल्लक आपण वेळोवेळी तपासणे, जरूरीचे असते. आपण जे पैसे भरतो ते स्लीपबुकाद्वारे भरतो. त्याच्या एका बाजुला आपणास बँकेद्वारे पावती मिळते. त्याच्यापाठी हे पैसे अथवा चेक कशाबद्दल भरला आहे ते लिहील्यास आपल्याला जेव्हा आपण बँकेतील जमा रक्कम बरोबर आहे ना ते पाहतो तेव्हा त्याचा खूप उपयोग होतो.

बँकेतून पैसे काढताना आपण चेकचा उपयोग करतो. अलिकडे 'एटीएम'ने देखील पैसे काढता येतात. बँकेतून घेतलेले 'डेबिट कार्ड' अथवा 'क्रेडीट कार्ड' द्वारे ही पैसे वापरता येतात. जेव्हा आपण 'एटीएम' मधून पैसे काढतो तेव्हा आपण त्याची पावती मशीनमधून मागू शकतो. जेणेकरून आपणास आपली हे पैसे काढल्यावर काय शिल्लक आहे ते कळते. मात्र ही पावती जपून ठेवणे गरजेचे असते. कित्येकदा आपण पाहतो की ही पावती वाचून तिकडेच चोळामोळा करून तो पेपर आपण टाकून देतो. त्यामुळे आपल्यानंतर 'एटीएम' मधून पैसे काढायला आलेल्याला आपला खाते क्रमांक व आपली बँकेतील शिल्लक कळू शकते. त्यामुळे ही खबरदारी घेणे गरजेचे आहे. आपले 'एटीएम' कार्ड पैसे काढल्यावर व्यवस्थित ठेवावे. आपला 'पासवर्ड' कधीही कार्डाबरोबर ठेवू नये. अन्यथा खणाला कुलूप लावून चावी बाजूलाच ठेवल्यासारखे होईल. मग त्याचा कोणी गैरफायदा घेतल्यास दोष कोणाला द्यायचा?

आपण वस्तूंची खरेदी 'डेबिट कार्ड' अथवा 'क्रेडिट कार्ड' द्वारे करतो तेव्हा दुकानदार आपणास आपण सही केलेल्या स्लिपची एक प्रत देतो ती आपण जपून ठेवली पाहिजे. आपल्या बँकेतील पासबुक तपासताना त्या कार्डाद्वारे खरेदी केलेल्या रकमेची नोंद आल्याचे पाहिल्यावर मग आपण ती स्लिप फाडून टाकल्यास चालू शकते. तोपर्यंत आपणास ती स्लिप नीट ठेवावी लागते.

आजकाल बँका खाते उघडताना आपला भ्रमणध्वनी क्रमांक लिहीण्यास सांगतात. आज जवळजवळ प्रत्येकाकडे 'मोबाईल' असतोच. आपण खाते उघडताना अथवा कधीही बँकेत जाऊन 'मोबाईल'द्वारे बँकेतील जमा व खर्चाची माहिती मागू शकतो. त्यामुळे आपणास जमा व खर्चाची नोंद तत्काळ समजू शकते. 'मोबाईल' द्वारे ही माहिती मागितल्यास आपण जरी कोठेही असलो तरी आपणास आपल्या खात्यातील 'जमा' अथवा 'खर्चाची' माहिती एसएमएसद्वारे मिळवता येते.

ह्या सोयीमुळे कित्येकदा बँक व्यवहारातील 'फ्रॉड' वेळीच निर्देशनास येतात. परवाच आमच्या सारस्वत बँकेतील एका खातेदाराचा फोन आला. पंधरा लाख रुपयाचा धनादेश मी कोणाला दिलेलाच नाही त्यामुळे माझ्या खात्यात एवढी रक्कम काढल्याचा एसएमएस वाचून तो भयभीत झाला. त्याने लागोलाग बँकेला फोन केल्यामुळे त्याच्या खात्यात चेकद्वारे होणारे व्यवहार थांबवता आले. त्या गृहस्थाला एक चेक गहाळ होऊन तो चुकीच्या हातात गेला व त्याचा गैरफायदा घेऊन पैसे काढण्याच्या भीषण कृत्याला एसएमएस द्वारे आळा बसला. बँकही गैरव्यवहार रोखू शकली. तेव्हा आजच्या संगणक युगात या सवलतींचा फायदा जरूर घेतला पाहिजे. बँकांमधील 'मोबाईल' बँकींगची सेवा वापरली पाहिजे. त्यामुळे आपणास आपल्या खात्यातील जमा खर्चावर योग्य नियंत्रण ठेवता येते. कोठल्याही वेळी 'मोबाईल'द्वारे आपल्या खात्यातील शिल्लक समजते.

आपल्या खात्याला 'नामनिर्देशन' म्हणजे नॉमिनेशन लिहिणे खूप महत्त्वाचे आहे. आपल्या पश्चात आपल्या खात्यातील रक्कम कोणाला मिळावी हे आपण त्याद्वारे बँकेला कळवू शकतो. पण जर नॉमीनेशन केले नाही तर मात्र आपल्या खात्यातील रक्कम बँक कोणालाही देऊ शकत नाही. मात्र आपण जर मृत्यूपत्रात त्याचा उल्लेख केला असेल तर खात्यातील रक्कम आपल्या मृत्यूपत्रानुसार त्या व्यक्तीला दिली जाते. अन्यथा दहा वर्षांच्या वर आपले खाते बंद राहिल्यास ती रक्कम 'नामनिर्देशन' नसल्यामुळे सरकारी खात्यात जमा होते. बँकांनी देखील आपल्याकडील सर्व खात्यांना नामनिर्देशन केल्याची खात्री केली पाहिजे. अन्यथा खातेदारांना बोलावून 'नामनिर्देशन' करून घेतले पाहिजे. त्यामुळे आपलाच पैसा आपल्या इच्छेनुसार वापरला जाईल व तो बँकेत तसाच पडून राहणार नाही.

आमच्याकडे एका 'सेव्हिंग्ज' खात्यात बऱ्यापैकी रक्कम जमा होती. खातेदार खूप जुना होता. त्या खात्यातून नेहमी एका देवळाच्या ट्रस्टला भरघोस देणगी दिली जायची. अचानक खातेदाराचा मृत्यू ओढवला. खातेदाराला जवळचे नातेवाईक नसल्यामुळे देवळाच्या ट्रस्टींनी खात्यातील रक्कम त्यांना देण्यास विनविले. दरवर्षी त्यांना मिळणाऱ्या देणगीचे दाखले त्यांनी दिले. पण म्हणून बँकेला थोडेच ते पैसे देवळाच्या ट्रस्टींना देता येणार? त्या खात्याला नामनिर्देशन नसल्यामुळे ती रक्कम तशीच पडून राहिली. आता ती रक्कम दहा वर्षांनी कोणीच नॉमिनेशन नसल्यामुळे सरकारी खात्यात जमा होणार.

कित्येकदा आजी-आजोबांना आपल्या खात्यातील रक्कम आपल्या नातवाला द्यावयाची असते. पण नातू अठरा वर्षांहून लहान असतो त्यामुळे त्याच्या नावे नामनिर्देशन करताना ते 'मायनर बाय गार्डियन' असे करावे लागते. नातवाला गार्डियन म्हणून त्या नातवाच्या आई-वडिलांना ठेवावे लागते व मग नातू अठरा वर्षांचा झाल्यावर नातवाला त्या खात्यातील रक्कम आजी आजोबांच्या पश्चात मिळू शकते. या साऱ्या गोष्टी आपण विचारपूर्वक केल्या पाहिजेत. आपण एकदा लिहिलेले नामनिर्देशन आपल्या हयातीत बदलू शकतो. आपल्याजवळ देखील त्याची नोंद ठेवणे आवश्यक आहे.

बँकेत आपला पत्ता बदलल्यास कळविणे जरूरीचे आहे. त्याद्वारे आपणास येणारी बँकेतील पत्रे, आपले चेकबुक, 'एटीएम', 'डेबिट', 'क्रेडिट' कार्ड योग्यवेळी मिळू शकते. आपले डेबीट कार्ड व त्याची पासवर्डची स्लीप ही दोन वेगवेगळ्या वेळी येते ती आपण त्वरीत योग्य ठिकाणी ठेवली पाहिजे. कधीही या दोन्ही गोष्टी एकत्र ठेवू नयेत.

आजच्या युगात पैसा हा केवळ चलनी नाणी अथवा नोटांच्या रुपात न राहता तो चेक, एटीएम, मोबाईल डेबिट अथवा क्रेडिट कार्डाद्वारे वापरता येतो त्यामुळे त्या सर्व सोयींचा उपयोग नीट काळजीपूर्वक केला पाहिजे.

*

## पाठारे प्रभु महिला समाज


पाठारे प्रभु महिला समाजाचे शताब्दीप्रीत्यर्थ कार्यक्रमाचे दुसरे पुष्प म्हणून रविवार दिनांक १४ डिसेंबर २०१४ रोजी पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात १२ वा रस्ता खार (पश्चिम) येथे सुप्रसिद्ध अभिनेत्री व गायिका श्रीमती रजनी जोशीप्रस्तुत नाट्य, सुगम संगीताचा 'क्षण आला भाग्याचा' हा कार्यक्रम आयोजित केला होता.

प्रसिद्ध अभिनेत्री व गायिका कै. ज्योत्स्ना भोळे यांच्या गाजलेल्या नाट्यसंगीतावर आधारीत त्यांची गाजलेली गाणी 'खेळेल का देव माझीया अंगणी, देवा बोला हो माझ्याशी, रुसली राधा रुसला माधव, तुझं न माझं जमेना. मी पुन्हा वनांतरी फिरेन हरिणीवाणी अशी एकापेक्षा एक सरस गाण्यांची मेजवानी श्रोत्यांना मिळाली.

श्रीमती रजनी जोशींच्या शिष्या सौ. नीलाक्षी पेंढारकर, सौ. अपर्णा हेगडे व कु. सुवर्णा घैसास ह्यांनी सुरेल आवाजात गाणी सादर केली. त्यांना साथसंगत श्री. केदार भागवत व श्री. प्रसाद पंडीत यांनी केली.

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# युवामंच

## Is it on the right lines?

-Anjore Paresh Kothare

Just recently ,I read a book named 'The Dollar Bahu', authored by Sudha Murthy . It is a stereotypical story of a small town boy enamored by the unsurpassed wealth of 'The Land where Dreams Come True', America, and the things that he has to let go to achieve this long cherished dream of his. There is nothing extraordinarily different either about the subject or the storyline . My reader , you must be wondering why am I telling you all this ?Am I not able to find a good topic to write about ? .Uh…It is nothing of that sort .

When I was over and done with reading the book , it was 11:30 in the night .I kept it by my bedside , turned the lights off and was trying to lull myself to sleep but…I couldn't .

The series of events that I read about in the book were once again being replayed in my mind .Chandrashekhar's (the protagonist) unstoppable desire to go and work in America , the enticing luxuries of that nation, the desire that kept him away from his near and dear ones, his marriage to Jamuna , Jamuna's cruelty to Chandrashekhar's family , he being deeply unsatisfied with his decision of going to America but yet being incapable of renouncing the comforts that that country had dished out to him.

I wondered whether his desire to leave his own motherland and go to some unknown nation and live a life that of a slave was on the right lines?. I was really unable to deduce a conclusion out of it . There are hundreds of thousands of Chandrashekar's in this country , who are so driven by the desire to leave this country and settle abroad that they often belittle the cost they pay for it .Here, I must admit that even I was one such Chandru. Have we ever given a thought to the fact that if all the talented youth of this country migrates to some unknown land in a quest for comfort then 'What Will Happen Of My Beloved India?'. This thought ended there , I was soon in deep slumber and my questions remained unanswered.After this I had my unit tests .I got busy with those and this thought soon drifted away .

Then I took up another book to read ,' Haak Aabhalachi 'written by the famous writer S.N. Pendse. It was about the 'Lion of India ', Lokmanya. I finished reading that book and by the end of it the intricately tangled net of questions in my mind slowly began to untangle. It said that there was nothing wrong in going to a better developed nation and having a desire to stash your bank account with heaps of money . But, once you have learned and earned to your heart's content , it is important to give back something worthwhile to your own country . It is like the repayment of a debt .

Soon the clutter in my mind about this was cleared and I was able to gain a better perspective . One book was the reason behind the arousal of a question in a tender teenage mind and the other was a befitting answer to it. Strangely , these two books came into my reading one after the other.

## केवळ गंमत म्हणून

चिंटू:- आजोबा, सांगा पाहू नारायणाचे पारायण लवकर होईल की नामदेवाचे पारायण

आजोबा:- अरे चिंट्या, लेका, असले फालतू प्रश्न कशाला विचारतोस? अरे, पारायण करायला दोघांना सारखाच वेळ लागेल की. मग ते पारायण नारायण करो, अथवा नामदेव करो.

चिंटू:- चूक आजोबा. अहो, नारायणचे पारायण अगोदर होणार. 'नारायण' मधला 'ना' काढून त्याजागी 'पा' जोडला की झाले नारायणचे पारायण. पण नामदेवमधली ना, म, दे, व ही चार अक्षरे काढून त्याजागी पा, रा, य, ण ही चार अक्षरे जोडायची म्हणजे जादा वेळ लागणारच.

*

प्रश्न- देव वर असतो, पण याला पुरावा काय?

उत्तर- देव नक्कीच वर असावा. हे आम्ही शाळेतच शिकलोय. प्रश्नाचे उत्तर हवे असले की गुरुजी म्हणायचे, द्या उत्तर झटपट, 'हरी' अप.

*

प्रश्न- प्रौढ साक्षराने परमेश्वरात काय पहावे?

उत्तर- प्रौढ साक्षराने परमेश्वरात फक्त प, र, मे, श्व, र ही अक्षरे पाहावीत.

*

कथा

# हेराफेरी

-आ. म. विजयकर

ज्युवेलरीच्या प्रदर्शनाला खूप गर्दी झाली होती. रंजनाने सगळ्यांवरून एक नजर फिरवली. तसे कपडे सगळ्यांचेच झकपक होते. दागिनेही मुख्यकरून मोत्याचेच होते. पटकन असली नकली फरक ऐऱ्यागैऱ्यांना कळणं नाही. तरीपण मुद्दाम होऊन एखाद दुसरा नग वा खडा पहायला मागणारे फारच थोडे होते. रजनीला मुद्दामच खांडवालांनी बोलावले. तिचा डिटेक्टीव्ह म्हणून चांगलाच बोलबाला झाला होता. तसंच काही चोरीबिरी झालीच तर? आपण काळजी घेतलेली बरी. जातीनं दारावर लक्ष ठेऊन होते ते कारण पैसे देऊन विकत घेणारे आणि उगीचच प्रदर्शन बघायला येणारे ते तसे ओळखू शकत होती अन् इतक्यात काउन्टरवर चौकशी करणाऱ्याकडे तिचे लक्ष वेधले. एका अप्रतिम हिऱ्यांचे असणारे ते पान पहायला मागत होते. खांडवाले जातीने त्यांना हवे नको बघत होते. दोन वयस्क पुरुष, एक नाकात हिऱ्याची चमचम करणारी चमक्या घातलेल्या चाळीशीतील. ते पान बघत असतानाच दुसऱ्या एकीने दुसऱ्या खांडवाल्यांनी तत्परतेने दुसरे पान मान खाली वाकवून बाहेर काढले. मात्र मान वर करून पाहिले पान आत ठेवणार तोच त्यांना एक जागा रिकामी दिसली. त्यांनी तत्परतेने दार बंद करून घेतले आणि पोलीस स्टेशनशी संपर्क साधला. रजनीही खांडवाल्यापाशी पोचली. तिने सीसीटीवी पाहिला. दुसऱ्या तयार दागिन्यांच्या काऊन्टरवर ती स्वत: खांडवाला आणि दुसरे दोघे मदतनीस. परत परत बघून हैराण झाली. दुकान बंद तर ठेवता येत नव्हते आणि जास्त बोलबाला तर करायचा नव्हता. दुसऱ्या दिवशीचा सीसीटीवी परत संध्याकाळी पाहिला. आदल्या दिवसासारखेच गिऱ्हाईक तयार दागिने, खडे वगैरे घेणाऱ्यापैकी होते. परत परत पहाता तिने आदल्या दिवसाची गिऱ्हाईके बघितली. तीचती चुईंगम चघळणारी. एकदा सवय लागली की लागली. तिने सीसीटीवी बंद करायला सांगितला अन खांडवाल्यांना घेऊन ती परत काऊन्टरजवळ गेली. तिने टेबलवर हात फिरवला व नंतर काऊन्टरखाली हात फिरवला. हाताला काही तरी चिकट लागले. तिने नखाने ते उपटले. सुकलेले च्युईंगम होते. तिने पोलिसांना काही सूचना दिल्या व तिचा संशय त्यांना सांगितला. त्याप्रमाणे पोलिसांनी त्या चौघांवर लक्ष ठेवले. लवकरच पोलिसांच्या पहाऱ्याला यश आले. त्या चौघांपैकी एक बाई अन एक माणूस सोनाराकडे जाताना आढळले. पोलिसांनी आधीच खड्याचे वर्णन, वजन, आकार, सर्व सोनारांना कळवले होतेच. ह्या दोघांनी खडा काऊन्टरवर दाखवला आणि कशी खराब परिस्थिती आल्यामुळे तो घराण्याचा खडा त्यांना विकावा लागत असल्याची कर्मकहाणी सुनवली. गल्यावर बसलेल्या मालकाने कंट्रोल रुमची डायरेक्ट बेल दाबली. दुसऱ्या मिनिटाला साध्या पोषाखातले पोलीस आत शिरले. मालकांनी त्या गिऱ्हाईकाकडे बोट दाखवले. त्यांनी हटकताच खडा खिशात घालून ते दोघेजण त्वरेने बाहेर पडले. पोलिसांनी शिटी वाजवली. बाहेर युनिफॉर्ममध्ये पोलिस उभे होते. त्यांच्या तावडीत अलगत ते चौघे सापडले. पोलीस स्टेशनवर घडघड बोलू लागले. खडा कसा पळवला. आम्ही त्या दिवशी खडा नेलाच नाही. त्या दिवशी त्या काउन्टरच्या खालच्या बाजुला आम्ही च्युईंगम लावून चिकटवले होते. त्यामुळे प्रत्यक्ष तपासणीत आमच्या अंगावर तुम्हाला मिळालंच नाही. नंतर दुसऱ्या दिवशी आम्ही च्युईंगम काढून तो खडा घरी नेला. तपासणी सगळ्यांची आदल्या दिवशी झाली होती. दुसऱ्या दिवशी काहीच तपासणी नव्हती.

खांडवाल्यांनी रजनीचे आभार मानले.

प्रश्न- सामान्य माणूस आणि सम्राट गौतम यांच्यात फरक काय?

उत्तर- सामान्य माणूस सभोवारचे दु:ख पाहून हत'बुद्ध' होतो, तर सम्राट गौतम सभोवारचे दु:ख पासून गौतम 'बुद्ध' होतो

*

प्रश्न- जनक राजाला मुली किती?

उत्तर- जनकाला मुली दोन. एक सीतामाई, जी भूमीत अंतर्धान पावली आणि दुसरी 'चिंता'. ती अजूनही अश्वत्थाम्याप्रमाणे चिरंजीव आहे. तीच ती आपली 'चिंता'जनक.

*

प्रश्न- मृत्यूनंतर मानव पहिल्यांदा काय करतो?

उत्तर- मृत्यूनंतर जर मानव प्रथम काय करीत असेल तर तो ही 'कुडी' सोडतो. मात्र 'पुरुष' मृत्यूनंतर फक्त एकच कुडी (शरीर) सोडतो, पण महिला मात्र एकूण तीन कुड्या सोडतात. पहिली म्हणजे ही मनुष्यदेही कुडी आणि उरलेल्या दोन त्या कानातल्या 'कुड्या'.

*

विनोदी संवाद

# 'आज कालची पिढी'

-सौ. विजयश्री नवलकर

विद्यार्थी: सर, सर, मी ना; सातव्यांदा सातवीत नापास झालो. आता मला शाळा सोडावी लागेल. मी शाळा सोडणार आहे. (नाकात बोटे घालून)

सर: मग तू काय करणार आहेस?

विद्यार्थी: सर तुम्हीच सांगा मी काय करू? सर मला विकास करायचा आहे. परंतु मी माझा विकास कसा करू?

सर: हे बघ; प्रथम तू तुझा खोडकरपणा सोड. मला आठवते तुझी चेष्टा मस्करीची पद्धत. एकदा तुझ्या वडिलांचे मित्र रात्री घरी आले. त्यांना तू सरळ सांगीतलेस की बाबा घरात नाहीत. ते विल्सन कॉलेजमध्ये गेले आहेत. परंतु ते घरीच होते.

विद्यार्थी: सर ते घरी होते. परंतु डब्ल्यू.सी.मध्ये गेले होते. त्यांना कमीत कमी एक तास बाहेर येण्यास लागतो. मग मी काय खोटे सांगितले? परंतु बाबा मला रागावले! मी म्हणालो ''बाबा त्यांचा तास दीडतास वेळ कशासाठी वाया घालवायचा?

सर: बरे ते जाऊ दे! एकदा तर तू चक्क तुमच्या शेजारच्या घराच्या कंपाऊंडमध्ये चार बांबू, काथ्याचा दोरा आणि मडके व इतर गोष्टी आणून ठेवल्यास.

विद्यार्थी: सर मला वाटले हा आजारी म्हातारा रात्री गचकणार. तेव्हा लोकांना त्रास होऊ नये म्हणून अगोदरच सोय करून ठेवली! 'त्याचा परिणाम काय झाला माहित आहे?' कां सर? सकाळी उठून शेजारच्या घरातल्या बायका, पुरुष आणि मुले मोठ्यामोठ्याने रडू लागली. मला वाटले हा म्हातारा वारला असेल. तर तो म्हातारा स्वत:च उठून आला व त्यांना म्हणाला 'अहो तुम्ही रडता कशाला? त्या म्हाताऱ्याचे भूत आले आहे समजून त्या म्हाताऱ्याला पाहून सर्व मंडळी घरी पळाली. मग काय विचारता? हे सामान घरासमोर कुणी ठेवले याचे तर्क वितर्क सुरू झाले आणि माझे श्रम खरोखरच फुकट गेले. शिवाय बाबांनी मला मार दिला तो वेगळाच.

सर: आता तू शाळा सोडून काय करणार?

विद्यार्थी: सर मी कविता करून पोट भरणार. बोलून दाखवू का ही कविता? मला माळ्यावर हे जुने मासिक सापडले. त्यात कुणीतरी सुलोचना त्रिलोकेकर या नावाने लिहिलेली कविता मी माझ्या नावाने छापणार. बोलून दाखवू का कविता तुम्हाला ? पहा, ती अशी आहे -

**''प्रौढा''**

केस पाहूनी पिकलेली  
बावरली ती प्रौढा  
दर्पणी पाहे पुन्हा पुन्हा जीव  
जाहला वेडा।।  
तारुण्य सरले ते स्वप्न  
विरले संसाराचे  
जाहले मन दु:खित तिचे  
आले विचार साचे।।  
कैसा गेला माझा काळ  
वीस वर्षांपूर्वी  
नको स्मृती अन् आठव  
त्याची जीवा या दुर्दैवी।।  
सापडले प्रेमात एका  
तरुणाच्या सुंदर  
झाले वेडे माझे मन भेटाया  
आतुर।।  
सुधीर नाव त्याचे आई  
करू का पाणीग्रहण?  
विचारता असला प्रश्न,  
वाटे समीप ये मरण.''  
नाही आपुल्या जातीचा  
ज्ञात नसे का तुजला.'  
कशास पुससी तू मज बाळे  
प्रश्नच हा असला?  
हृदयी बसता हा घाव, वाहे  
प्रीतीची जखम  
सत्वरी राया रे त्याजीले  
भावनांना कायम।।  
तारुण्याचे 'फुलपाखरु'  
उडून गेले त्वरी  
प्रौढपणाचा सहारा जणु  
तळपे माझ्या शिरी।।  
संसार झाला आई, तुझा  
अन् तुझ्या लेकरांचा  
वगळले गेले मी, घाला हा  
अन्यायाचा  
रोज शिकविते विद्यार्थ्यांना  
न्यायाने वागा  
परि असल्या अन्यायाला  
काय करू सांगा?

सर, कशी वाटते तुम्हाला ही कविता? मी माझ्या नावावर छापणार आहे आणि या कवितेचे नाव मी 'दुर्दैवी' असे देणार आहे. मी आता २१ व्या शतकात कविता शीर्षक '२१ वे शतक' देऊन लिहिणार आहे. ही कवितासुद्धा कुणी विजयश्री नवलकर हिने लिहिली आहे. बघा बरं ही कविता-

केशकर्तन जेव्हा केले तेव्हा  
माता रागावली  
''काय केलेस तरी अशी  
बुद्धी कशी जाहली?''  
प्रियकराला माझ्या  
आवडतात छोटे केस  
दुसऱ्यासाठी सतत जगावे  
तूच सांगितलेस  
अर्धे कपडे घालुनी मी  
कॉलेजात गेले  
तरी शतक एकवीस म्हणून  
जग पुढे चालले  
करा तयारी लग्नाची घाई  
मी सांगते तुलाही  
नाहीतर आई करावी  
लागेल बारशाची घाई।।

सर: पण हे चौर्यलेखन आहे! हे मूर्खा, दुसऱ्याचे लेखन चोरून तुला काय फायदा?

विद्यार्थी: मग मी काय करू सांगा? आयडिया सर; मी राजकारणी होणार! मला पदवी मिळण्याची सोय सहज करता येईल. मी निवडणूकांसाठी माझी खोटी पदवी, खोटे वय, खोटी जात सर्व सादर करू शकतो. सर तुम्हीच सांगा शिक्षण आणि पदव्या घेऊन कुणाचे भले झाले आहे का?

सर: मूर्खा, राजकारण तुला काय खवा वाटतो का?

विद्यार्थी: सर, मला वाटतं राजकारणी नेहमी खवाच खाणारे असतात.

सर: मग सांग तू काय करणार? कसा होणार राजकारणी?

विद्यार्थी: प्रथम मी गुंडांच्या गँगमध्ये जाऊन नंतर त्यांच्याशी मैत्री करणार. म्हणजे थोडे थोडे पैसे आपोआपच खिशात पडणार. शिवाय सर्व लोकांशी माझी दाट मैत्री होईल. पोलीस, मंत्री, आमदार सगळे चांगले लोक असतात, म्हणूनच ते मोठे पोट घेऊन गाडीतून फिरतात.

सर: मूर्खा, तू विकासावर कविता कर पाहू.

विद्यार्थी: सर तुमचा सदैव करीन मी विकास.

राजकारणी होण्याची  
लागली मज आस  
प्रथम करीन मी माझ्या  
पोटापाण्याचा विकास  
मोठे पोट घेऊनी मी गाडीत  
बसेन खास  
दररोज येण्याजाण्यासाठी  
दहा गाड्या घेऊनी तुमचा  
विकास करीन मी खास  
गाडी देऊनी सर्वांना कर  
लावूनी मी पैसे मिळवीन  
पेट्रोल आणि डिझेलचे पैसे  
मी वाढवून सर्व टोल  
नाक्यांना मी पैसे लावणार  
आपोआप माझ्या खिशात  
पैसा येणार. पलंगावर पडून  
मी झोपून राहणार.  
मुख्यमंत्री होण्याचे मी स्वप्न  
पाहाणार

सर: सध्याच्या पिढीपुढे मी हात जोडून नमस्कार करतो.

*

## पाठारे प्रभू सोशल समाज

रविवार, दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात पा. प्र. सोशल समाजातर्फे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १५ वर्षांखालील स्पर्धकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक होता. रांगोळी, चित्रकला, हस्तकला या स्पर्धांचे परीक्षण श्री. विश्वास भाटकर यांनी केले; तर वेशभूषा, संगीत व अभिनय या स्पर्धांचे परीक्षण श्री. मोहन गुरव यांनी केले. या स्पर्धांना प्रेक्षक-श्रोत्यांची उपस्थिती लक्षणीय होती. सर्व उपस्थितांना समाजातर्फे कॉफी देण्यात आली. समाजाच्या अध्यक्षा श्रीमती स्वाती प्रवीण राणे यांनी परीक्षकांचा परिचय करून दिला. परीक्षकांना भेटवस्तू देण्यात आली. विजेत्या स्पर्धकांना समाजाचे विश्वस्त श्री. माधव जयकर आणि श्री. अजित तळपदे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. सर्व स्पर्धकांना समाजातर्फे सहभागाची प्रमाणपत्रे देण्यात आली. स्पर्धांचे निकाल पुढीलप्रमाणे-

०

१) **चित्रकला स्पर्धा**: (वेळ- ३० मिनिटे)

**अ-गट** : १५ वर्षांखालील

**विषय** : बगीचा

प्रथम क्रमांक- कु. रितिका राहुल जयकर

द्वितीय क्रमांक- कु. आलिशा निकोलाई कीर्तिकर

तृतीय क्रमांक- कु. यश शैलेंद्र तळपदे

**ब-गट** : १५ वर्षांवरील

**विषय** : स्वच्छ भारत अभियान

सौ. पूजा मंदार कोठारे यांना समाजाचे बक्षीस

३) **हस्तकला स्पर्धा**: (वेळ- ३० मिनिटे)

(पान ६ कॉलम ३ वर)

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिभा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळसाखर दिला

०१-२-१५ कु. नेहा राजन वामनराव जयकर, श्री. जयशील प्रफुल्ल खंडेराव प्रधान

### मरण

०४-१-१५ सौ. सुवर्णा (चारू) माधव केशव राव, वय ८४, अंधेरी
१९-१-१५ श्रीमती शीला बाळकृष्ण कीर्तिकर वय ८१, मालाड

***चुकीची दुरुस्ती***

गतांकी 'नारळ साखर दिला' या सदरात कु. देवश्री नीलेश भालचंद्र कोठारे आणि श्री. रिषीकेश तेज प्रताप वेलकरअसे हवे.
तसेच 'आत्याबाई नाव बोला' या सदरात पुढील नावे स्वतंत्रपणे हवीत.
कु. अनिंदीता विद्याधर आगासकर
तरुष जितांशु प्रफुल्ल कोठारे
ती 'नांदा सौख्यभरे' मध्ये चुकून छापली गेली आहेत. झालेल्या चुकांबद्दल दिलगीर आहोत.

## प्रभुतरुणास देणगी

✶ सौ. निलिमा सुजन राणे यांजकडून रु. २५०१/-

✶ श्री. प्रताप मो. बा. वेलकर यांजकडून रु. १०००/-

## अभिनंदन

✶ कु. आद्या निखिल सुरेश नवलकर ही इयत्ता सातवीत असलेली विद्यार्थिनी इंटर नॅशनल मॅथ्स ऑलिंपियाड या परीक्षेच्या प्रथम फेरीत पहिली आली आणि 'गोल्ड मेडल'ची मानकरी ठरली. दुसऱ्या फेरीसाठी तिची निवड करण्यात आली आहे.

✶ डॉ. सौ. सुमन नवलकर यांच्या 'सुट्टीतील खजिना' पुस्तकाला काशीताई आगाशे पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन

✶ लक्ष्मीकांत बेर्डे स्मृति पुरस्कार सोहळा टी.व्ही. वर साजरा झाला. (कै.) विहंग नायक दिग्दर्शित 'कॅम्पस' नाटकातून लक्ष्मीकांतचे पहिले पदार्पण रंगभूमीवर झाले; याचा आवर्जून उल्लेख झाला. लक्ष्मीकांत बेर्डेमधील कलावंत असा घडल्यावर श्री. महेश कोठारे यांच्या अनेक चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या. ते या कार्यक्रमात प्राधान्याने दाखवले. श्री. महेश कोठारे, आदिनाथ कोठारे सहकुटुंब या कार्यक्रमाला उपस्थित होते.

✶ गुरुदत्त यांच्या ५० व्या स्मृतिदिना निमित्त ग्रंथाली आणि प्रभात चित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने रुपवाणीचा 'गुरुदत्त' विशेषांक श्री. श्याम बेनेगल ह्यांच्या हस्ते १३ ऑक्टोबर २०१४ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये प्रकाशित केला गेला. ह्या अंकात फ्रेंच भाषेतील गुरूदत्तवरील पहिल्या प्रदीर्घ लेखाच्या मराठी अनुवादाचा समावेश आहे. हा अनुवाद डॉ. ज्ञानेश्वरी तळपदे ह्यांनी केला आहे. मूळ फ्रेंच लेख १९७५ साली 'लावाँ सेन सिनेमा' ह्या फ्रेंच सिने मासिकात आँरी मिचिओलो ह्यांनी लिहिलेला होता. डॉ. ज्ञानेश्वरी यांचे अभिनंदन.

✶ सॉलिसिटर राजन जयकर यांचे 'लीगल बॉम्बे' हे 'कॉफी टेबल बुक' लवकरच प्रकाशित होत आहे. नववर्षाचे शुभेच्छापत्र पाठवताना अत्यंत उचित असा जुन्या मुंबईचा नकाशा आणि तत्संबंधी मजकूर त्यात त्यांनी समाविष्ट केला आहे. पुस्तक प्रकाशनाला शुभेच्छा.

✶ श्रीम. मृदुला प्रभुराम जोशी यांचे कोल्हापूरला वि. स. खांडेकर स्मृति व्याख्यानमालेअंतर्गत संहिता संपादनावर भाषण आयोजित करण्यात आले.

✶ श्री. सुजन राणे यांचे पुणे, गोवा आदि ठिकाणी शास्त्रीय गायन सादर झाले.

✶ श्री. श्रेयस तळपदे यांचे 'पोश्टर बॉईज' गाजल्यावर आता त्यांचा 'बाजी' चित्रपट येत आहे. चित्रपटसृष्टीत ते अशीच बाजी मारोत ही शुभेच्छा.

✶ श्री. शोहन श्रीलेश त्रिलोकेकर हे सिम्बॉसिस डिप्लोमा मार्केटिंग ॲडमिनिस्ट्रेशन (पीजीडीबीए) 'ग्रेडमध्ये उत्तीर्ण झाले. अभिनंदन.

(पान ५ कॉलम ४ वरून)

**अ-गट** : १५ वर्षांखालील
**विषय** : पट
प्रथम क्रमांक- पार्थ इंद्रजीत कीर्तिकर
द्वितीय क्रमांक- कु. आलिशा निकोलाई कीर्तिकर
४) **संगीत स्पर्धा**: (वेळ- १ तास)
**ब-गट** : १५ वर्षांवरील
**विषय** : हिंदी चित्रपट गीत
प्रथम क्रमांक- सौ. सुहास नंदकुमार विजयकर
द्वितीय क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे
तृतीय क्रमांक- सौ. वीणा प्रवीण अजिंक्य
५)**वेशभूषा स्पर्धा**: (वेळ- ३ मिनिटे)
**अ-गट** : आठ वर्षांपर्यंत
प्रथम क्रमांक- कु. अवंती असित तळपदे
द्वितीय क्रमांक- कु. यथार्थ मंदार कोठारे
तृतीय क्रमांक- विवान श्रीपाद आगासकर
**ब-गट** : ८ ते १५ वर्षांपर्यंत
प्रथम क्रमांक- रितिका राहुल जयकर
द्वितीय क्रमांक- आंचल शैलेश तळपदे
तृतीय क्रमांक- कु. तनया दीपक धराधर
**क-गट** : १५ वर्षांवरील
सौ. स्वप्ना विनित जयकर यांना समाजाचे बक्षीस.
६) **एकपात्री अभिनय स्पर्धा**: (वेळ- ५ मिनिटे)
**ब-गट** : १५ वर्षांवरील
प्रथम क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे
द्वितीय क्रमांक- सौ. स्वप्ना विनित जयकर

### परीक्षेतील सुयश

**सी. ए. फायनल**

कु. विनिता महेश कमलाकांत कोठारे

### पाठारे प्रभु सोशल समाजाचा १२७वा वर्धापनदिन

शनिवार दि. २१ मार्च २०१५ रोजी (गुढीपाडवा) खारच्या पा. प्र. हाऊसिंग सोसायटीच्या सांस्कृतिक सभागृहात डॉ. सौ. अश्विनी (देसाई) वाघ यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्व ज्ञातीबांधवानी या समारंभासाठी अवश्य उपस्थित रहावे असे आग्रहाचे निमंत्रण समाजाच्या कार्यकारिणीने दिले आहे.

**खास पाठारे प्रभूंचा ताशा**
मुंजी, लग्न, वरघोडा आणि वरातीसाठी संपर्क:-
**श्री. मंगू ताशेवाला**
मोबाईल नं.:
९९२०५८२२६५/९९३०८३८६९९
पत्ता:
खोली क्र. ७, पहिला मजला,(जयश्री मसाला वर),
बिल्डिंग नं. ६७/६९,
कामाठीपुरा ७वी गल्ली,
एम. आर. रोड, मुंबई-४०००08

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.
संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67